# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, ३०२३३४४७ फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना :**

क्रमांक:२अ/एडीएम/२०१३/पीजी ॲडमिशन/ ६६४
दिनांक : ०८.०४.२०१३

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील एम.ई/एम.टेक व एम.आर्च या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रथम वर्ष पुर्ण वेळ एम ई. / एम.टेक आणि एम.आर्च. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्यात येणार आहेत. या संदर्भात दोन्ही पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची सामायिक प्रवेश परीक्षा आणि केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेची जबाबदारी सक्षम प्राधिका-यांच्यावतीने अनुक्रमे कॉलेज ऑफ इंजिनियरींग, पुणे व सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी शासकीय संस्थांच्याबाबतीत १०० टक्के आणि विनाअनुदानीत संस्थामधील मंजुर प्रवेश क्षमतेच्या ८० टक्के प्रवेश केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत व २० टक्के जागांवरील प्रवेश संस्थास्तरावर करण्यात येणार आहे. त्यासंबंधीचे शपथपत्र संस्थांना संचालनालयास सादर करणे बंधनकारक असेल. अल्पसंख्याक संस्थांना कोटयासाठीच्या जागा व संस्था स्तरावरील जागांचा स्पष्ट उल्लेख केलेले शपथपत्र संचालनालयास सादर करणे अनिवार्य राहील. ज्या विनाअनुदानीत व अल्पसंख्याक संस्था शपथपत्र सादर करणार नाहीत, त्या संस्थांच्या सर्व १०० टक्के जागा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्यात येतील.

प्रथम वर्ष पुर्ण वेळ एम ई. / एम.टेक आणि एम.आर्च. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे नियम शासन मान्यतेनंतर संचालनालयाच्या संकेतस्थळावर (http://www.dte.org.in) उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबत सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात येते की, एम ई. / एम.टेक आणि एम.आर्च. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश संस्थास्तरावर करू नये, अन्यथा होणा-या शिस्तभंगास संस्थेला जबाबदार धरण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई